म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बौ०वा०
दा. क्र. १०३९६
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
१०३९६

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाळ-वाङमय
दा. क्र. १०३९८



# जादूची नगरी

२

आशा गवाणकर

किंमत एक रुपया ● © आशा गवाणकर १९६२ ● ठसे : धारगळकर प्रोसेस स्टुडिओ, मुंबई ७
प्रथम मुद्रण : नोव्हेंबर १९६२–मार्गशीर्ष १८८४ ● मुद्रक : कृष्णा शं. करवार, कॉनवे प्रा. लि. (प्रिन्टर्स),
६, टलो रोड, मुंबई १ ● प्रकाशक : ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी, ताडदेव रोड, मुंबई ३४.

# जादूची नगरी

भाग २ रा

दा. क्र. १०३९६
क्र. १०३९६
वि. ५।५५

आशा गवाणकर



चित्रकार : व्ही. एम्. साठे

अनुक्रम ३४०७६
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ३०८
नों. दि. २०।३।६३

पॉप्युलर प्रकाशन
मुंबई

# चल ग सई!



चल ग सई–
कुठें ग बाई ?

मळ्याच्या वाटेवर–
चिमुकला ससुकला
मस्ती करतोय
तिथं ग बाई !



चल ग सई–
कुठें ग बाई ?

तळ्याच्या कांठावर–
ढवळुला बगळुला
शिकार हेरतोय
तिथं ग बाई !

चल ग सई–
कुठें ग बाई ?



पिंपळाच्या पारावर–
चिमुरडी खारकुंडी
फुगडी घालतेय
तिथं ग बाई !

चल ग सई–
कुठें ग बाई ?



अंब्याच्या झाडावर–
काळुबाई साळुबाई
कुहु कुहु करतेय
तिथं ग बाई !

चल ग सई–
कुठें ग बाई ?

गाईच्या गोठ्यामधीं–
भुरकं वासरुं
टुकु टुकु बघतंय
तिथं ग बाई !



चल ग सई–
कुठें ग बाई ?

आईच्या कुशीमधीं–
तान्हं चिमणं
चुखु चुखु करतंय
तिथं ग बाई !



चल ग सई–
चल ग बाई !

# काय करावें ?

काय करावें ?

मला वाटतें, रोज सकाळीं
लोळत गादीवरति रहावें--
कुणी उठवितां मुळीं न उठावें
'ऊठ ऊठ' मज आई बोलते
हात खेंचते-काय करावें ?



ताक घुसळतां आई वाटे--
तिथेंच बसुनी ताक करावें
लोणी हातावरती घ्यावें
'नको सतावुंस मला पोरटे'
आई म्हणते--काय करावें ?

नहावया मी जातां वाटे--
खूपखूपसें पाणी घ्यावें
दार लावुनी आंत नहावें
आई येते रागें भरते
ट्टा देते--काय करावें ?



मित्रमैत्रिणी जमवुनि वाटे-
नाटक छोटेंसेंच करावें
खेळ मजेचे खेळुनि घ्यावे
त्यांनाहि परी आई बोलते
मला मारते–काय करावें ?



रिमझिम पाऊस पडतां वाटे-
उभें राहुनी त्यांत भिजावें
थयथय नाचत गाणें गावें
फरफर ओढीत आई नेते
कान उपटते–काय करावें ?



अशी आई मज छळते छळते-
परिहि मला ती बहु आवडते
काय करावें ? काय करावें

# हसरें जग



सुंदर फुलांचें—
फूलपांखरांचें—
पाकळ्या कळ्यांचें जग हें असे!



वरी नभांतून—
हसे नारायण
इथं सोनियानं—
चमकतं पान
डुले वारीयानं—
हिरवं हिरवं रान
रानपांखरांचें
नदी नि झऱ्यांचें जग हें असे!


नभाची कमान—
त्यांत रंग छान
जांभळ्या ढगाला—
म्हणावें विमान
नव्हे नभ जाण—
असे रत्नखाण
हिऱ्या माणकांचें—
चंद्र चांदण्यांचें जग हें असे!

असं जग छान—
हरपतं भान
हसऱ्या जगाची
हास्य हीच खूण
हसऱ्या फुलांचें
हसऱ्या मुलांचें जग हें असे!


# वेडा मासा



चिमुकला मासा : आई ग मी जाऊं का ?
जाऊं का ? मी जाऊं का ?
पाण्याच्या ग बाहेर
जग आहे सुंदर
झुलतं ग फूल ना
फुलते ग वेल ना
हिरवं ग रान तें
चमकतं पान तें



तिथं आई जाऊं का ?
जग सारं पाहूं का ?
माशाची आई : नको जाऊं राजसा
चिमुकल्या पाडसा
तूं रे माझा छकुला
चिमणा रे कुकुला
तुझं माझं जग रे
वेगळंच बघ रे
पाण्याचंच घर हें
पाण्याचंच दार हें



तूं मी इथं राहूं या
धावूं या नि पोहूं या
लाटेवर लोळ तूं
कमळाशीं खेळ तूं
किरणांशीं बोल तूं
वाऱ्यासंगें डोल तूं

जमिनीच्या वर रे
भय आहे फार रे
तिथं नाहीं जायचं
ऐकायचं आईचं !




चिमुकला मासा : नाहीं जा मी ऐकत
जाईन जा मी तिथं
जाऊं ना ग ? बोल ना—
जाऊं ना ? मी जाऊं ना ?

बेडूकमामा : थांब जरा बाळ रे—
थांब जरा वेळ रे
दोर एक फेंकतों
वर तुला काढतों



किरणाचा दोर रे—
धरूनीया वर रे
चढ वर वर रे
सर सर सर रे !



मार उडी एक ती
जमिनीच्या वरती
बघून घे रान हें
चमकतं पान हें
जमिनीचं जग रे
कसं आहे बघ रे !

चिमुकला मासा : आलों आलों वरती
मजा वाटे फार ती
पण—पण हें कसें ?
मला काय होतसे ?
तगमग वाटते
भय कीं रे दाटतें
कंठप्राय शोषतो
गेला वाटे जीव तो
मेलों – मेलों आई ऽ ग—
सोडव ग धाव ग
कुणी मला सोडीलें ?
पाण्यामध्यें धाडीलें ?
मामा, मामा तूंच ना ?
वांचविलें आज ना ?



पण माझी आई ती
आहे कुठें सांग ती ?
आई ऽ आई ऽ आई
बोलत कां नाहीं ग



बोल आई बोल ग
चुकलों मी आज
आतां पुन्हां जर का—
चुकलों मी बरं का—
तर राग धर ग—
मला आई मार ग
पण आतां बोल ग—
एक वेळ बोल ग !
माशाची आई : ये रे माझ्या छकुल
चिमण्या रे कुकुल्य
उगी-उगी-उगी तो-
जळो माझा राग त

# सुंदरता सारी!



बघेन चंद्राची—नगरी रत्नांची
जाऊनी थेट—
अन् घेऊनी भेट—
मेघांच्या राजाची !

लेईन चंदेरी—परकर जरतारी
मोत्यांची झुल—
अन् केसांत फुल—
खोवीन सोनेरी !

नाचेन दरबारीं—घेऊन ललकारी
हातांत छन—
अन पायांत छन—
मंजुळ मनहारी !



चंद्राची स्वारी—खुलेल की भारी
म्हणेल 'नाच—
नाच बाई नाच—
तुला देईन अंबारी !'

घेईन अंबारी—येईन मग दारीं
मनांत बघ—
माझ्या जगांत बघ—
सुंदरता सारी !


# कपिला रुसली



कपिला रुसली मान फिरविली—
दूध देइना—देईचना !
ओला चारा दिला तिला पण—
मुळिंच खाइना—खाईचना !
तोंच चिमुकलें तिचें वासरूं—
आले थुईथुई नाचत ना !
लाडें लाडें तिला बिलगलें—
लहानसें तें लबाड ना !
कपिला हलली, भुलली, खुलली—
सुटला पान्हा खरंच ना !



गोड दुधानें चरवी भरली—
धार तरीहि सरेचना !
पुढ्यांत पाणी दिलें ठेवुनी—
वळुनी तिकडे पाहीचना !
पाठीवरुनी हात फिरविला—
परंतु रुसवा जाईचना !



गुणी शहाणी कपिला राणी—
म्हटलें तरि ती खुलेचना !
वटारुनी मग डोळे मोठे
दटाविलें तरि हलेचिना !
दृष्ट काढिली नवसहि केले—
दूध देईना—देईचना !
काय करावें ? कसें करावें ?
कुणास कांहीं कळेचना !

# रान पांखरें!

आनंदी स्वच्छंदी रानपांखरं—
सृष्टिदेविचीं हो आम्ही लेंकरं !

अमुच्या शेतांत सृष्टीची शाळा
सृष्टीची शिकवण बाळगोपाळां
झुलत्या पिकांचा झुले झोंपाळा
सृष्टिदेविचीं हो आम्ही लेंकरं !

ऊनपावसांत थंडी नि वाऱ्यांत
तांबड्या मातींत खपून शेतांत
आलें नवें बळ अमुच्या हातांत
सृष्टिदेविचीं हो आम्ही लेंकरं !

नदी नि झऱ्याचें सुंदर संगीत
कोकीळ राणीचें कुहु कुहु गीत
गाण्याचें शिक्षण अमुचें हो त्यांत
सृष्टिदेविचीं हो आम्ही लेंकरं !

अम्हांसि माहीत अन्नाचें ज्ञान
श्रमावें कसावें कसुनी प्राण
जगवावें जग सारें जीव ओतून
सृष्टिदेविचीं हो आम्ही लेंकरं !

# आई कां ग ?

बाळ : मी जिथें खेळतों तिथें ग आई–
चिमणुताई कां येते ?

आई : ती बहिण धाकुटी भावासंगें–
खेळाया येते ?



बाळ : मी जिथें जेवतों तिथें ग आई–
मनी मावशी कां येते ?

आई : ती चिमणा भाचा कसा जेवतो–
पहावया येते ?

बाळ : मी जिथें धावतों तिथें ग आई–
वारा संगें कां येतो ?

आई : तूं पडशिल बिडशिल म्हणुनि राजसा–
सांवरण्या येतो !

बाळ : मी जिथें चालतों तिथें ग आई–
चांदोमामा कां येतो ?

आई : तूं चुकशिल बिकशिल म्हणुनि तुझ्या तो–
सोबतिला येतो !



# बाहुलीचा खेळ

बाहुलीचा खेळ बाई—भारी मला आवडे—
मांडीलें मीं घरकूल खेळूं आज या गडे !


बाहुलीच्या खेळामध्यें—होईन मी आज आई
काकी मामी मावशी नि—व्हा ग कुणी ताई माई
कुणी व्हा ग आजीबाई लाजूं नका या गडे
बाहुलीचा खेळ बाई—भारी मला आवडे !





सुरू झाला खेळ आतां झाली बाई ग सकाळ
कामांपुढें नाहीं मला चहा पिण्यासही वेळ
सोनुली ही त्यांत रडे जरा कुणी घ्या गडे
बाहुलीचा खेळ बाई—भारी मला आवडे !

केव्हांची मी ओरडतें—नाहीं कुणाला कदर
लाडावून ठेवलीत घरांतलीं सारीं पोरं
जा बाहेरी पाठ करा आपआपुले धडे
बाहुलीचा खेळ बाई—भारी मला आवडे !






कामांमध्यें काम बाई घेऊं जरा उरकून
सोनुलीला न्हाऊं घालूं पाणी घ्या ग बाई ऊन
उगी उगी काय झालं पुरें बाई हें रडें
बाहुलीचा खेळ बाई—भारी मला आवडे !

नळू सुळू कुणी जरा मांडून घ्या ताटपाट
रांगसत राहूं नका कामें करा झटपट
चेंगटपणा ग बाई मला मुळीं नावडे
बाहुलीचा खेळ बाई—भारी मला आवडे !

जेवणाच्या पंगतींत बोलूं नये हो मुलांनीं
जेवणाच्या आधीं नको पिऊंस अरू तूं पाणी
पानाभोंवतालीं उष्टें सांडलेंस केवढें ?
बाहुलीचा खेळ बाई—भारी मला आवडे !

झालीं बाई जेवणें तीं आटोपला ग पसारा
हां हां म्हणतां बाई वाजून गेलेत बारा
सोनुलीला घेतें जरा वेळ मला सांपडे
बाहुलीचा खेळ बाई—भारी मला आवडे !

किती बाई सोनुली ग आहे तरी ही गुणाची
किती बाई गोडी हिच्या गालांतल्या साखरेची
अमृतही फिकें पडे या ग साखरेपुढें
बाहुलीचा खेळ बाई—भारी मला आवडे !




# चांदोबा



चांदोबा मजला
वरुनी बघतो-
बघुनि हसतो
मज आवडतो !

सं. ठाणे,
नों. दि ..............
क्र. ..............
वि. ..............

कसा चमकतो
सुंदर दिसतो
छानच दिसतो
मज आवडतो !

खेळ खेळतो
मला खुणवितो-
ये ये म्हणतो
मज आवडतो !



ढगांत लपतो
गंमत करतो -
जंमत करतो
मज आवडतो !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय ठाणे